
पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

वाशिम

■ वर्ष १ ■ अंक ३७ ■ बुधवार दि. १ जुलै २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पुष्ठे ४

Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




## » थोडक्यात

### सचिन अहिर विधान परिषदेच्या उपसभापती पदी



मुंबई : महाराष्ट्र विधान परिषदेतील उपसभापती पदासाठी आज निवडणूक झाली. यामध्ये शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार सचिन अहिर यांची एकमताने निवड करण्यात आली. उपसभापती पदासाठीच्या निवडणुकीसाठी महायुतीकडून शिवसेना शिंदे गटाचे सचिन अहिर आणि महाविकास आघाडीकडून शिवसेना ठाकरे गटाचे जगन्नाथ अभ्यंकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. विधान परिषदेतील आकडेवारी पाहता महायुतीचे एकतर्फी विजय झाला असता. परंतु तरी देखील मंत्री आणि भाजपचे नेते चंद्रकांत पाटील यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार जगन्नाथ अभ्यंकर यांना दाखल केलेला उमेदवारी अर्जाचा प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली.

---

### व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या दरात कपात!

नवी दिल्ली : व्यावसायिक वापराच्या गॅस सिलिंडरच्या दरात मोठी कपात करण्यात आली आहे. १९ किलोच्या एलपीजी सिलेंडरच्या दरात १८३.५० रुपयांची कपात करण्याचा निर्णय पेट्रोलियम कंपन्यांनी घेतला आहे. तर पाच किलोच्या लहान गॅस सिलिंडरच्या दरातही १३ रुपयांची कपात करण्यात आली आहे. त्यामुळे १९ किलो आणि ५ किलोच्या सिलिंडरची राजधानी दिल्लीलीत किंमत अनुक्रमे २९३० रुपये आणि ८०८.५० रुपयांवर पोहोचली आहे. बुधवारी सकाळपासून नवे दर लागू झाले आहेत. गेल्या काही महिन्यांमध्ये व्यावसायिक वापराच्या गॅस सिलिंडरच्या दरात सातत्याने वाढ होताना दिसत होती.

# भाजप हा पत्त्यांच्या बंगल्यासारखा!

## खालचा पत्ता नरेंद्र मोदींचा तो सटकला

प्रतिनिधी दि. १ जूलै

भाजपा हा पत्त्याच्या बंगल्यासारखा आहे. याचा जो खालचा पत्ता आहे तो नरेंद्र मोदींचा आहे. तो एकदा सटकला तर सगळे कोसळणार आहे. जे काही आज टिकून आहे ते नरेंद्र मोदींवर टिकून आहे. हे बाकीच्यांवर नाही. अशा गोष्टींमध्ये तुम्ही जे भयानक राजकारण खेळताहेत हे त्यांच्याही अंगलट येणार आहे, अशी प्रखर टीका मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आजच्या फोडाफोडीच्या राजकारणावर केली. ठाण्यात आज झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. ते ज्या-ज्या वेळी सत्ताधाऱ्यांनी आपला विरोधक संपवला आहे. तेव्हा त्यांच्यातच विरोधक तयार झालेले आहेत आणि त्यांनी त्यांनाच संपवले आहे. ही प्रक्रिया भाजपात सुरू झाली आहे. त्यामुळे बाहेरचे विरोधी पक्ष तुम्ही संपवणे हे सोडून द्या. पण आज तुमच्यात जे विरोधक निर्माण झालेत यातून तुम्हाला जो त्रास होईल तो तुम्ही बघत राहा. समोरचे विरो तुम्ही संपवले तेव्हा तुमच्या विरोधक तयार होतात. हा जग इतिहास आहे. आणीबाणी

### अमित शाहांवरही साधला निशाणा

» हे सगळं अमित शाहांचे राजकारण सुरू आहे. शिवसेनेचे ६ खासदार फोडले ते भाजपात का गेले नाही? टीएमसीचे २२ खासदार फुटले त्यांचा वेगळा गट का तयार केला..उद्या मला पंतप्रधानपदावर दावा करायचा असेल तेव्हा मला आतून विरोध झाला तेव्हा हे लोक बाहेरून मला पाठिंबा देतील. जर दुसऱ्या कुणी दावा सांगितला तर मी जे लोक उभे केले आहेत त्यातले कुणी पाठिंबा देणार नाही. समोरचे विरोधक संपवता तेव्हा विरोधक तुमच्यातच तयार होतात. हे चित्र महाराष्ट्रात आणि देशात तुम्हाला दिसेल. अगदी खालपर्यंत दिसेल. बेधुंद सत्ता येते तेव्हा माणसं अशी वागायला लागतात असं सांगत राज ठाकरे यांनी अमित शाहांवर निशाणा साधला.

### देहविक्रीला हे तया

» महाराष्ट्रात जे फोड गलिच्छ आहे. हे चांगले रा अशा गोष्टींचा भाजपालाही त्रा काय करतोय, कुठपर्यंत जा नाही? प्रश्न विकत घेणाऱ्यांच देहविक्रीला हे तयार असतील राजकारण आहे. लोकांमध्ये य उन्हातान्हात उभे राहायचे म काही चांगले राजकारण नाह केली.

### आपण देश कुठे नेणार आहोत?

महाराष्ट्रात ३ वर्षांनी निवडणुका आहेत. आता ही एसआयआर प्रक्रिया राबवणार, दरवर्षी मुले १८ वर्षांची होत अस ही प्रक्रिया थांबवून चालणार नाही तर सुरूच ठेवावी लागेल. एसआयआर प्रक्रियेचा सर्वात मोठा फटका पश्चि यांच्यासारख्या माजी मुख्यमंत्र्यांचा पराभव होतो. हे जे काही घाणेरडे राजकारण सुरू आहे त्याचा फटका भविष्



# मनपाच्या 21 नगरसेवकांवर टांगती तलवार

प्रतिनिधी दि. १ जूलै

**अकोला** : अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ मधील राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या विजयी उमेदवारांसाठी निवडणूक विभागाकडून एक महत्त्वाची सूचना जारी करण्यात आली आहे. नियमांनुसार, राखीव जागेवरून निवडणूक जिंकलेल्या उमेदवारांना निकाल लागल्यापासून ६ महिन्यांच्या आत जात पडताळणी समितीकडून प्रमाणित केलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असते.

या ६ महिन्यांची मुदत येत्या १५ जुलै रोजी संपत आहे. अकोला महानगरपालिका निवडणुकीत राखीव प्रवर्गातून एकूण ३७ उमेदवार विजयी झाले होते. यामध्ये अनुसूचित जातीचे (एण्) १४, अनुसूचित जमातीचे (एऊ) २ आणि इतर मागासवर्गीय (धृंण्) प्रवर्गातील २१ उमेदवारांचा समावेश होता. मात्र, या ३७ पैकी आतापर्यंत केवळ १६ विजयी उमेदवारांनीच आपली प्रमाणपत्रे निवडणूक विभागाकडे जमा केली आहेत. यामध्ये अनुसूचित जातीमधील ६, अनुसूचित जमातीमधील १ आणि इतर मागासवर्गीय प्रवर्गातील ९ उमेदवारांचा समावेश आहे.

उर्वरित २१ विजयी उमेदवारांनी अद्याप आपले जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. निवडणूक विभागाकडून या उमेदवारांना वारंवार दूरध्वनीद्वारे संपर्क करण्यात आला असून लेखी सूचनाही पाठवण्यात आल्या आहेत. १५ जुलैपर्यंत ज्या उमेदवारांची प्रमाणपत्रे मिळणार नाहीत, अशा उमेदवारांचा सविस्तर अहवाल पुढील कायदेशीर आणि शिस्तभंगविषयक कारवाईसाठी थेट 'राज्य निवडणूक आयोगाकडे' पाठवला जाईल, असा इशारा संबंधित अधिकाऱ्यांनी दिला आहे.

### त्वरीत सादर करावे अन्यथा..

» या १५ जुलैला या ६ महिन्यांचा कालावधी पूर्ण होत असून, अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीमध्ये राखीव प्रवर्गातून ज्यामध्ये अनुसूचित जातीमधून १४, अनुसूचित जमातीमधून २ आणि इतर मागासवर्ग प्रवर्गातून २१, अशा एकूण ३७ उमेदवारांनी निवडणूक लढवली होती. त्यामधून अद्यापपर्यंत आम्हाला अनुसूचित जातीमधील ६, अनुसूचित जमातीमधील १ आणि इतर मागासवर्ग प्रवर्ग यामधील ९ अशा एकूण १६ विजयी उमेदवारांनी जात पडताळणी अहवाल आणि त्याबाबतचे प्रमाणपत्र निवडणूक विभागाकडे सादर केलेले आहेत.अद्यापभी २१ निवडणूक जिंकलेल्या उमेदवारांनी त्यांचं जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेलं नाही.

- अनिल बिडवे, निवडणूक अधिकारी,मनपा,अकोला.

# नगरसेविकेच्या पतीची अकोल्यात तर, बार्शीटाकळी तालुक्यात युवकाची हत्या

प्रतिनिधी दि. १ जूलै

**अकोला** : मंगळवारी दोघांची हत्या करण्यात आल्याने जिल्हा हादरला. अकोल्यात जुने शहरातील प्रभाग क्रमांक १७ च्या नगरसेविका यांचे पती याकूब खान यांच्यावर स्टेशन रोडवर जिजाऊ हॉलसमोर प्राणघातक हल्ला झाला होता. उपचारा दरम्यान मंगळवारी सायंकाळी त्यांचा मृत्यू झाला. तर दुसरी घटना बार्शीटाकळी तालुक्यात निंबी येथे शेतीच्या वादातून युवकाची हत्या झाली. रात्री ही घटना घडली. जुना शहर भागातील प्रभाग क्रमांक १७ च्या काँग्रेस नगरसेविका



रफियाबी यांचे पती याकूब खान यांच्यावर न्यायालयाच्या समोर जिजाऊ हॉलजवळ काही अज्ञात व्यक्तींनी धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला केला. खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. काही दिवसांपूर्वी जुना शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या पोळा चौक परिसरात आरोपींसोबत त्यांचा वाद झाला होता. त्याच वादाचा वचपा काढण्यासाठी हा हल्ला झाल्याची माहिती मिळत आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या याकूब खान यांना प्रथम सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने नातेवाईकांच्या मागणीवरून त्यांना आयकॉन रुग्णालयात रेफर करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच याकूब खान यांच्या समर्थकांनी आणि नातेवाईकांनी रुग्णालय परिसरात प्रचंड गर्दी केली होती.

दरम्यान, काही पोलीस कर्मचारी लॉकअपमधून आरोपींना न्यायालयात हजर करण्यासाठी

# जीएमसीच्या नवनियुक्त प्रशासकीय अधिकारी आरती जगताप अपघातात ठार

## कुटुंबातील चौघांचा दुर्दैवी मृत्यू

प्रतिनिधी दि. १ जूलै

**अकोला** : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या नवनियुक्त प्रशासकीय अधिकारी आरती जगताप यांचे समृद्धी महामार्गावर धामणगावजवळ झालेल्या भीषण अपघातात निधन झाले. या अपघातात त्यांच्या कुटुंबातील आणखी चार सदस्यांचाही मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

आरती जगताप यांनी नुकतीच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेने प्रशासकीय अधिकारी म्हणून नियुक्ती झाली होती. शासनाने त्यांची अकोला येथील जीएमसीच्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये नियुक्ती केली होती.



त्यांनी २७ जून रोजी नव्या पदाचा कार्यभार स्वीकारला होता. सेवेला दोनच दिवस झाले असताना रविवारी कर्तव्यावर येण्यासाठी अकोल्याकडे परत येत असताना समृद्धी महामार्गावर धामणगावजवळ त्यांच्या वाहनाला कंटेनरची जोरदार धडक बसली.

या भीषण अपघातात आरती जगताप यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील चार सदस्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. नव्या जबाबदारीची स्वप्ने डोळ्यांत घेऊन सेवेला सुरुवात केलेल्या अधिकाऱ्याचा असा अकाली अंत झाल्याची बातमी समजताच जीएमसी व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील अधिकारी, डॉक्टर आणि कर्मचारीवर्गावर शोककळा पसरली.

नव्याने रुजू झालेल्या सहकाऱ्याला इतक्या अल्पावधीत गमावल्याने सर्वांनाच मोठा धक्का बसला. सोमवारी (२९ जून) जीएमसीमध्ये आयोजित शोकसभेत वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी व सहकाऱ्यांनी आरती जगताप यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

### ठाकरेंचा विधान परिषदेतील आणखी एक आमदार गळाला!

**मुंबई** : आमदार सचिन अहिर यांच्या शिंदे शिवसेनेतील प्रवेशानंतर आता आणखी एक विधान परिषद आमदार गळाला लावण्याची शिंदे शिवसेनेची तयारी सुरु असल्याची माहिती मिळत आहे. ठाकरेंच्या उर्वरित विधानपरिषदेतील पाच आमदारांपैकी सुनील शिंदे हे शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हावर निवडून आले आहेत. त्यामुळे सुनील शिंदे यांना सोबत घेण्याचा प्रयत्न शिंदे शिवसेनेकडून केला जात असल्याचे सूत्रांची माहिती आहे. सुनील शिंदे हे २०२१ मध्ये विधान परिषद आमदार झाले. यावेळी सुद्धा दोन्ही शिवसेना एकत्र होत्या. सुनील शिंदे हे शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हावर निवडून आले आहेत.

# अखेर 'एनएचएम'च्या 15 हजार कंत्राटी कर्मचाऱ्यांचा सेवा समायोजनाचा मार्ग मोकळा!

## 1,153 कोटींच्या खर्चास हिरवा कंदील

प्रतिनिधी दि. १ जूलै

**यवतमाळ** : राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) अंतर्गत राज्यभर कार्यरत असलेल्या १५ हजार १० कंत्राटी कार्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. सलग १० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांसाठी समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदे निर्माण करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली असून, यासाठी वार्षिक १ हजार १५३.६० कोटी रुपयांच्या खर्चालाही मंजुरी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण



मंत्री प्रकाश आबिटकर तसेच राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या पाठपुराव्यानंतर हा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. यापूर्वी १४ मार्च २०२४ रोजी मंत्रिमंडळाने कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनाचा निर्णय घेतला होता. त्यानंतर ४ नोव्हेंबर २०२५ रोजी त्यात सुधारणा करण्यात आली होती. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या आंतरविभागीय समितीच्या शिफारशी आणि २५ जून २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. शासन निर्णयानुसार, २५ जूनपर्यंत २०२६ तांत्रिक खंड वगळता सलग १० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या १५,०१० कर्मचाऱ्यांना एकवेळच्या विशेष बाब म्हणून समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदांवर नियुक्ती दिली जाणार आहे. यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग आणि ग्रामविकास विभागातील नियमित मंजूर पदांशी संबंधित कंत्राटी पदांची समकक्षता निश्चित केली जाणार असून, आवश्यकतेनुसार इतर विभागांतील समकक्ष पदांचाही विचार केला जाणार आहे.


# शिक्षणाच्या आईचा घो...; विद्यार्थी म्हणणार आता 'निंबुडा.. निंबुडा..!

## ओडीशामधील प्रकार : कवितेच्या जागी चक्क ऐश्वर्याचे गाणे!

प्रतिनिधी दि. १ जूलै

**भुवनेश्वर** : ओडिशामध्ये इयत्ता ५ वीच्या विद्यार्थ्यांच्या पाठ्यपुस्तकात अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चनवर चित्रित झालेल्या 'निंबुडा-निंबुडा' या गाण्याचे लिरिक्स छापल्याचे आढळले आहे. १९९९ मधील 'हम दिल दे चुके सनम' या सुपरहिट चित्रपटातील या प्रसिद्ध गाण्याचे लिरिक्स इयत्ता ५ वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकात चुकून छापले गेले आहेत. शाळांमध्ये ही नवीन पाठ्यपुस्तके पोहोचल्यानंतर संपादकीय प्रक्रिया आणि गुणवत्ता नियंत्रणाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

'ओडिशा टीव्ही'च्या वृत्तानुसार, इयत्ता ५ वीच्या पाठ्यपुस्तकातले या गाण्याचे फोटो ऑनलाइन व्हायरल झाल्यानंतर ही चूक उघडकीस आली; शाळेतील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या या पुस्तक गाण्याचे लिरिक्स असल्याचे त्यातून दिस या घटनेमुळे ओडिशाती पाठ्यपुस्तकांमधील त्रुटीं वाद निर्माण झाला असू मीडियावरही या चुकीब प्रतिक्रिया उमटत आहेत. या चुकीमुळे पाठ्यपुस्तक बनव पुनरावलोकन आणि छपाईदरम्यान वापरल्य जाणाऱ्या गुणवत्ता नि उपायांबद्दल चिंता निर्माण झाली आहे. शिक्षण तज्ज्ञ आणि पालकांनी, एडिटींगच्या अनेक टप्प्यांमधून जाऊनही एवढी मोठी चूक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यापूर्वी



### अधिकाऱ्यांना केले निलंबित

» ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांनी 'शिक्षक शिक्षण आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद'चे माजी संचालक मनोज पाढी आणि तीन सहाय्यक संचालकांना निलंबित केले आहे. एका अधिकृत निवेदनानुसार, विकास आयुक्त डी. के. सिंग यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या अहवालाच्या आधारे ही कारवाई करण्यात पुस्तके तयार करण्यातील त्रुटींची चौकशी केली होती.

### ांमध्ये १६०० हून अधिक चुका

ाळकरी मुलांच्या पाठ्यपुस्तकांमधील चुकांबाबत ोण्याची ही पहिलीच वेळ नाही. 'राष्ट्रीय शैक्षणिक अंतर्गत राज्यात वितरित करण्यात येत असलेल्या स्तकांमध्ये १६०० हून अधिक चुका आढळून आल्या यत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या सीईआरटी'च्या ५५ नवीन पाठ्यपुस्तकांमध्ये ण १६७८ चुका सापडल्या. विशेष म्हणजे ८ या पाठ्यपुस्तकात सर्वाधिक म्हणजे ७०५ चुका या आहेत.

### तुमच्या रेशनची आम्हाला गरज नाही..

**रावळकोट** : पाकिस्तान-व्याप्त काश्मीरमध्ये पाकिस्तानी सरकारविरोधातील आंदोलने तीव्र झाली आहेत. पीओके हा पाकिस्तानचा भाग नाही, अशी घोषणा करत रावळकोट येथील ईदगाह मैदानावर हजारो लोक जमले.

या आंदोलनाचे नेतृत्व जम्मू आणि काश्मीर आवामी ॲक्शन कमिटी (जेएएसी) करत आहे. जेएएसीचे प्रमुख नेते शौकत नवाज मीर यांना धीरकोटच्या संगर फत्तारे भागातून त्यांच्या दोन साथीदारांसह अटक करण्यात आली. पीओकेमध्ये जेएएसीचे ६०० हून अधिक नेते आणि कार्यकर्त्यांनाही ताब्यात घेण्यात आले आहे.



# पहिल्याच पावसात अकोट-दर्यापूर मार्गाची पोलखोल

वि. प्रतिनिधी १ जुलै

अकोट–दर्यापूर मार्गावरील रंभापूर फाट्याजवळून ते अकोट नव्याने सुरू असलेल्या रस्ते बांधकामाची पहिल्याच जोरदार पावसात पोलखोल झाली आहे. पावसाच्या पाण्यामुळे रस्त्याचा काही भाग खचल्याने या मार्गावर मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली असून वाहनचालक व प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. लाखो रुपये खर्चून सुरू असलेल्या या कामाच्या गुणवत्तेबाबत नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

रंभापूर फाट्यापासून अकोटपर्यंतच्या रस्त्याचे बांधकाम गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू आहे. मात्र कामाचा वेग अत्यंत संथ असल्याने



नागरिक आधीच त्रस्त आहेत. त्यातच नव्याने तयार करण्यात आलेला रस्ता पहिल्याच पावसात खचल्याने कामाच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रस्ता खचून उखडलेला भाग आणि साचलेले पाणी यामुळे अपघाताचा धोका वाढला असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, रस्ते बांधकामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले असून कामात आवश्यक तांत्रिक निकषांचे पालन करण्यात आलेले नाही. त्यामुळे पावसाचे पाणी साचून रस्त्याची माती वाहून गेली आणि रस्ता खचल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. पहिल्याच पावसात रस्त्याची अशी अवस्था झाल्याने सार्वजनिक निधीचा अपव्यय झाल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे.

रस्ता खचल्यामुळे एका बाजूने वाहतूक सुरू ठेवावी लागत असल्याने दिवसभर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. विशेषतः शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी आणि रोजंदारीवर कामासाठी जाणाऱ्या नागरिकांना याचा मोठा फटका बसत आहे. अनेक वाहनचालकांनी संबंधित विभाग आणि कंत्राटदाराविरोधात संताप व्यक्त केला.

नागरिकांनी या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून रस्ते बांधकामाच्या गुणवत्तेची तपासणी करावी, दोषी कंत्राटदारांवर कठोर कारवाई करावी आणि खचलेला रस्ता तातडीने दुरुस्त करावा, अशी मागणी केली आहे. अन्यथा जनआंदोलन छेडण्याचा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे.

# उड्डाणपुलावर पाईप लाईन दुरूस्ती सुरू

प्रतिनिधी १ जुलै




**अकोला :** शहरातील उड्डाणपुलावर पाणी साचले आहे. पाण्याचा निचरा होत नसल्याने पुलाखालून जाणाऱ्या लोकांच्या अंगावर पाणी पडते. येथील समस्यांवर आर आर सी नेटवर्कने प्रकाश टाकला होता. त्याचा परिणाम झाला असून महापालिकेने फुटलेले पाईप दुरूस्तीचे काम हाती घेतले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट IMPACT

उड्डाणपुलावर साचलेले पाणी मोठ्या वाहनांमुळे दुचाकीस्वारांच्या अंगावर उडते. तसेच पुलाखालून जाणाऱ्या लोकांना अंगावर देखील उडते. साचलेले पाणी वाहून जाण्याची सोय नाही. फुटलेली पाईप लाईन हा मुख्य मुद्दा होता. या बाबतीत ओरड झाल्यामुळे अखेर महापालिका यंत्रणा जागी झाली. तसेच उड्डाणपुलाची फुटलेली पाईप लाईन दुरूस्तीचे काम सुरू आहे. यामुळे नागरिकांना भर पावसात ये जा करताना होणारी गैरसोय दूर होणार आहे.

# दिव्यांग सोशल फाउंडेशन तर्फे डॉ.हेलन केलर जयंती साजरी



प्रतिनिधी १ जुलै

**अकोला :** स्थानिक दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे डॉ.विशाल कोरडे यांच्या मार्गदर्शनात विविध सामाजिक उपक्रम भारतभर निरंतर राबवले जात आहे.

२७ जून रोजी दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे सूर्योदय बालगृह , मलकापूर येथे डॉ.हेलन केलर जयंतीचे आयोजन करण्यात आले होते . जगातील प्रथम स्नातक दिव्यांग महिला म्हणून डॉ.हेलन केलर जगविख्यात असून त्यांचे दिव्यांग बांधवांसाठी मोठे योगदान आहे . डॉ.हेलन केलर यांचा जीवन परिचय सूर्योदय बालगृहातील विद्यार्थ्यांना व्हावा या उद्देशाने डॉ.विशाल कोरडे यांच्या मार्गदर्शनात आगळावेगळा उपक्रम राबवण्यात आला . डॉ.हेलन केलर यांच्या प्रतिमेच्या पूजनानंतर विद्यार्थ्यांसोबत प्रश्नमंजुषा व विविध खेळातून त्यांची सामाजिक जाणीव जागृत करण्यात आली . दिव्यांग सोशल फाउंडेशन व श्रीनाथजी सुपर शॉपी जठारपेठ तर्फे सूर्योदय बालगृहातील विद्यार्थ्यांना राशन किटचे वितरण यावेळी करण्यात आले . जुलै व ऑगस्ट महिन्यात अकोल्यातील विविध शाळेत डॉ.हेलन केलर यांच्या जीवनावर व्याख्यान व नाटिकेचे निशुल्क आयोजन दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे करण्यात येणार असून, ज्या विद्यालयांना या कार्यक्रमाचे आयोजन करायचे आहे त्यांनी संस्थेच्या ९४२३६५००९० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा असे आव्हान डॉ.विशाल कोरडे यांनी केले . सूर्योदय बालगृहाचे श्री.शिवराज पाटील यांनी या कार्यक्रमाला शुभेच्छा देऊन अकोलेकरांनी दिव्यांग सोशल फाउंडेशन च्या सामाजिक उपक्रमात सहभाग नोंदवावा असे मत व्यक्त केले . कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विजय कोरडे, शुभम गढे, अस्मिता मिश्रा, अनुराधा साठे, चैतन्य राठी व डॉ.संजय तिडके, यांनी सहकार्य केले.

# मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या हस्ते मनपा शाळा क्र. २२ मध्ये शाळा प्रवेशोत्सव उत्साहात



प्रतिनिधी १ जुलै

**अकोला :** महानगरपालिकेच्या मराठी मुलांची शाळा क्र. २२, कृषीनगर येथे शाळा प्रवेशोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रम उत्साहपूर्ण व आनंददायी वातावरणात पार पडला. कार्यक्रमाला अकोला महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सुनील लहाने प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मनपा आयुक्त यांच्या हस्ते नवागत तसेच शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, शैक्षणिक साहित्य व शुभेच्छा देऊन उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आत्मविश्वास व प्रेरणा निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. याच कार्यक्रमात शिष्यवृत्ती परीक्षा तसेच बी.टी.एस. परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचे उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात कौतुक केले.

याप्रसंगी नगरसेवक आशिष पवित्रकार, नगरसेविका प्राची निलेश काकड, आयुक्तांचे स्वीय सहायक जितेंद्र तिवारी तसेच अकोला महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी हरीशचंद्र इटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी विद्यार्थ्यांनी नियमित शिक्षणासोबत शिस्त, स्वच्छता, वाचन आणि चांगले संस्कार जोपासावेत, असे सांगितले.

# जिल्हा स्त्री रुग्णालयात महिला सुरक्षा रक्षकावर हल्ला; घटना सीसीटीव्ही मध्ये कैद

प्रतिनिधी १ जुलै



**अकोला :** शहरातील जिल्हा स्त्री रुग्णालयात धक्कादायक घटना समोर आली आहे. रुग्णालयात कर्तव्य बजावणाऱ्या एका महिला सुरक्षारक्षक कर्मचाऱ्यावर रुग्णाच्या पतीने अचानक हल्ला केल्याची घटना घडली आहे. ही संपूर्ण घटना रुग्णालयातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

अकोला शहरातील जिल्हास्तरीय स्त्री रुग्णालयात प्रसूतीसाठी मोठ्या प्रमाणात महिला रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक येत असतात. याच दरम्यान एका महिला रुग्ण आणि तिच्या पतीमध्ये काही कारणावरून वाद झाल्याची माहिती समोर आली आहे.

वाद सुरू असताना रुग्णालयातील महिला सुरक्षारक्षक कर्मचाऱ्यांनी मध्यस्थी करत वाद शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, या गोष्टीचा राग मनात धरून काही वेळानंतर आरोपीने महिला सुरक्षारक्षकावर हल्ला केल्याचा आरोप आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एनआयसी कक्षाजवळ ड्युटीवर असलेल्या महिला सुरक्षारक्षक कर्तव्य बजावत असताना अचानक प्रदीप गावंडे यांनी त्यांच्यावर हात उचलला. ही घटना रुग्णालयातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्टपणे कैद झाली आहे.

घटनेनंतर एनआयसी कक्षातील कर्मचाऱ्यांनी तातडीने ११२ क्रमांकावर संपर्क साधून पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर रामदास पेठ पोलीस स्टेशनचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. रुग्णालयातील सुरक्षा रक्षकांनी आरोपीला ताब्यात घेऊन पोलिसांच्या स्वाधीन केले. मात्र, पोलिस कर्मचारी पोहोचेपर्यंत आरोपी फरार झाल्याची माहिती समोर आली आहे.

या घटनेनंतर अकोला जिल्हा स्त्री रुग्णालयातील महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यावर हल्ला करणाऱ्यावर कठोर कारवाई होणार का? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# डायल ११२ वर खोटे कॉल करणाऱ्यावर ग्रामीण पोलिसांची कारवाई

वि.प्रतिनिधी १ जुलै

**अकोट :** नागरिकांच्या सुरक्षेसाठी सुरू करण्यात आलेल्या डायल ११२ या एकात्मिक आपत्कालीन मदत सेवेचा गैरवापर करणाऱ्या एका युवकाविरुद्ध अकोट ग्रामीण पोलिसांनी कायदेशीर कारवाई केली आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक २९ जून २०२६ रोजी शुभम रघुनाथ भटकर (वय २५ वर्ष, रा. देऊळगाव, ता. अकोट, जि. अकोला) याने डायल ११२ या आपत्कालीन सेवा क्रमांकावर वारंवार कॉल करून खोटी माहिती दिली. या प्रकारामुळे आपत्कालीन सेवांच्या कामकाजात अडथळा निर्माण झाल्याने संबंधित व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली.

डायल ११२ ही नागरिकांसाठी उपलब्ध असलेली एकात्मिक आपत्कालीन मदत सेवा असून अपघात, गुन्हे, आग, महिला व बालकांवरील अत्याचार, वैद्यकीय आणीबाणी तसेच इतर तातडीच्या प्रसंगी त्वरित मदत मिळविण्यासाठी या सेवेचा वापर केला जातो.

यावेळी अकोट ग्रामीण पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, किरकोळ कारणांसाठी, खोटी माहिती देण्यासाठी किंवा विनाकारण डायल ११२ वर कॉल करून या महत्त्वाच्या सेवेचा गैरवापर करू नये. अशा प्रकारच्या खोट्या कॉलमुळे प्रत्यक्ष आपत्कालीन परिस्थितीत असलेल्या नागरिकांपर्यंत मदत पोहोचण्यास विलंब होऊ शकतो आणि त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.

# शेतकऱ्यांचे प्रश्न सभागृहात प्राधान्याने मांडणार : आमदार प्रताप अडसड

## धामणगाव मतदारसंघाच्या विकासाला चालना देण्यासाठी कटीबद्ध

प्रतिनिधी १ जुलै



**अमरावती :** पावसाळी अधिवेशनात धामणगाव मतदारसंघात शेतकरी, लाडक्या बहिणी तसेच रोजगार निर्मितीवर भर देण्याबाबत सभागृहात विषय लावून धरू असे आमदार प्रताप अडसड यांनी आर आर सी नेटवर्कशी बोलताना सांगितले.

पीक विमा बाबतीत शेतकऱ्यांना अडचणी जाणवतात असे सांगून आमदार प्रताप अडसड म्हणाले, सर्व्हे करताना बरेच शेतकरी लाभापासून वंचित राहतात. यातून मार्ग निघावा यासाठी आवाज उठवू. तसेच लाडक्या बहिणी, रोजगार विषयक मुद्दे उपस्थित करणार आहे. महायुतीच्या काळात विकास कामे प्रचंड प्रमाणात झाली. तसेच येत्या काळात विकासाला चालना देण्यासाठी प्रयत्न करू असे आमदार प्रताप अडसड म्हणाले. आमचे अमरावती प्रतिनिधी संदीप मानकर यांनी त्यांच्याशी मुंबई येथे संवाद साधला.

# डॉ. जगन्नाथ ढोणे विद्यानिकेतन मध्ये शाळा प्रवेश

**अडगाव बु. :** डॉ. जगन्नाथ ढोणे विद्यानिकेतन येथे नविन शैक्षणिक वर्षाला दिनांक ३० जून रोजी एका अनोख्या पद्धतीने सुरवात करण्यात आली. यावेळी सर्वप्रथम महात्मा फुले आणि सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

' देवाची पालखी गावांत येते. आज न्यायाची पालखी शाळेत आली आहे. ' असा जयघोष करत विद्यार्थी शाळेत आले. पालखी मध्ये भारतीय संविधान, पुस्तके ,महापुरुषांच्या प्रतिमा ठेवून प्रभात फेरी काढण्यात आली. सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी ,पालक यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

# अमरावती विमानतळाची धावपट्टी विस्ताराचा मुद्दा सभागृहात प्राधान्याने मांडणार : आ. प्रवीण पोटे

## १८०० मीटर धावपट्टी तीन हजार मीटर होणे आवश्यक आहे

प्रतिनिधी १ जुलै

**अमरावती :** परिसराच्या विकासाशी विमानतळ विस्ताराचा मुद्दा निगडित आहे. यामुळे व्यापार उद्योगाला चालना मिळेल असे आमदार प्रवीण पोटे यांनी आर आर सी नेटवर्कशी विधीमंडळ परिसरात बोलताना सांगितले. बेलोरा विमानतळाची धावपट्टी सध्या १८०० मीटर आहे तीन हजार मीटर झाल्यास मोठी विमाने लँड होऊ शकतील. या संदर्भात आवाज उठवू असे आमदार प्रवीण पोटे म्हणाले.


विमानतळ तसेच शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, रोजगार



निर्मितीला चालना देण्यासाठी सभागृहात आवाज उठवू. पांदण रस्ते, शेतीला पाणी देणे यावर विधीमंडळात फोकस करू असे आमदार प्रवीण पोटे यांनी सांगितले. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यावर भर राहील असे ते म्हणाले.

# आधुनिक कृषीप्रधान भारताचे कृषीसंत !

कृषि दिन हा कृषीप्रधान देशाचा एक पावन पर्व मानला जातो. त्यामुळे कृषी दिनाला विशेष असे महत्त्व आहे. कृषी दिन १ जुलै रोजी हरितक्रांतीचे जनक महानायक वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त शासन स्तरावर साजरा केला जातो. याच दिवशी अन्नदाता शेतकऱ्यांचा सर्वत्र सन्मान केला जातो. तसेच 'शेती आणि माती'वर निस्सीम भक्ती असणारे जागतिक ख्यातीचे कृषीतज्ञ व प्रगतशील शेतकरी महानायक वसंतराव नाईक यांना आदरांजली अर्पण केल्या जाते. महानायक वसंतराव नाईक यांचे लोकशाही सक्षमीकरण, ग्रामीण विकास व विशेषतः कृषी औद्योगिक क्षेत्रातील क्रांतिकारी योगदानामुळे त्यांना 'महानायक' , 'शेतकऱ्यांचा जाणता राजा' म्हणूनही संबोधले जाते. भारताचे राष्ट्रपती , भारतरत्न डॉ. प्रणव मुखर्जी यांनी 'वसंतराव नाईक हे भारत मातेचे थोर सुपूत्र आहे.' या शब्दात नाईकांचे गौरव केले. तसेच 'थेट शेतकऱ्यांच्या बांधावर' मोहिमेचे प्रवर्तक, विचारवंत एकनाथराव पवार यांनी 'आधुनिक कृषीप्रधान भारताचे कृषीसंत' या शब्दात महानायक वसंतराव नाईक यांचे वर्णन केले आहे.



### कृषीदिनाचा बांधापर्यंतचा प्रवास

या दिवशी कृषीसंस्कृतीचे संस्मरण करून कृषीसंस्कृतीच्या समृद्धीसाठी संकल्प केल्या जाते. हा पर्व थेट बांधावर , शेत शिवारातही साजरा होत असून यात शेतकरी सन्मान, समुपदेशन , नव कृषी तंत्रज्ञानाची ओळख , फळझाडांची लागवड व शेतकऱ्यांचे भाग्यविधाते महानायक वसंतराव नाईकांना आदरांजली अशा विविध स्वरूपात साजरा केला जातो. थेट शेत बांधावर शेतकऱ्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली जावी, शेतकऱ्यांना आत्महत्यापासून परावृत्त करून आत्मबळ मिळावे. आधुनिक शेती तंत्राचा जागर व्हावा, शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक व्हावा शेतकऱ्यांप्रति कृतज्ञता व्यक्त केली जावी या उद्देशाने प्रसिद्ध विचारवंत एकनाथराव पवार यांनी कृषी दिवस थेट बांधावर , शेत शिवारात साजरा करण्याची सर्वप्रथम मोहीम सुरू केली होती. या मोहीमेची दखल पुढे सामाजिक स्तरासोबतच 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड'ने दखल घेतली. शिवाय पुढे सन २०१९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या काळात शासनस्तरावरही दखल घेण्यात आली. त्यामुळे कृषी दिन थेट शेत बांधावरही साजरा होत असल्याने या दिवसाला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झाले. ड५ड़६ क़ार्यालयात साजरा होणारा कृषी दिन हा आता थेट बांधावरही साजरा केला जात असून कृषीदिनानिमीत्त थेट बांधावर कृषी संजीवनी सप्ताह , वसंतराव नाईक हरित महाराष्ट्र अभियान व शेतकरी कृतज्ञता सप्ताह सारखे स्तुत्य उपक्रम दरवर्षी राबविले जातात.

भारतीय आधुनिक कृषी क्षेत्रात क्रांतिकारी योगदान असलेल्या आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कृषी तज्ज्ञ व पहिले शेतकरी मुख्यमंत्री, हरितक्रांतीचे जनक महानायक वसंतराव नाईक यांची जयंती 'कृषी दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय सन १९८९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी घोषित केला. तेव्हापासून १ जुलैला शासकीय स्तरावर सर्व कार्यालयात कृषीदिन साजरा होत आहे. तर दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे शेतकऱ्यांचे कैवारी, शेतीवर निस्सीम भक्ती असणारे क्रांतिकारी कृषीसंत वसंतराव नाईक नेहमी म्हणायचे कि, 'मी मुख्यमंत्र्यांच्या सिंहासनावर देहाने असलो तरी माझे चित्त मात्र शेतकऱ्यांच्या बांधावर असतो.' हा 'वसंतविचार' लक्षात घेता शेतकऱ्याप्रति कृतज्ञता, शेतकऱ्याना आत्मबळ व आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची ओळख देण्यासाठी प्रसिद्ध साहित्यिक, विचारवंत एकनाथराव पवार यांनी कृषी दिन थेट बांधावर साजरा करण्याची अभिनव संकल्पना रूजवली. तेंव्हापासून कृषीदिवस हा थेट बांधावर शेत शिवारातही साजरा करण्यास सुरुवात झाली.ड३. कार्यालयात साजरा होणारा कृषीदिवस आज थेट शेत बांधावरही साजरा करण्याची प्रथा रूढ झाली. कृषी दिन 'शासकीय कार्यालयीन स्तरावर ते थेट शेत बांधावर ' साजरा करण्याच्या या प्रवासात मात्र 'पवार' हा एक दुर्मिळ संयोग जुळून आल्याचे म्हणता येईल. आज कृषी दिवस हा कार्यालयाबरोबरच थेट शेतबांधापर्यंत सर्वत्र साजरा होतो. इतर राज्यात देखील १ जुलैला कृषी दिन साजरा होतांना दिसून येते.

कृषीप्रधान भारत म्हणून ओळखले जाणाऱ्या देशात कृषीसंस्कृतीचे स्मरण आणि शेतकरी कृतज्ञतेचा प्रतिक म्हणून १ जुलै कृषीदिनाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. कृषी दिवस हा नैसर्गिकरित्याच पेरणीच्या मुहूर्तावर आलेला एक पावनपर्व आहे. महानायक वसंतराव नाईक यांनी हरितक्रांती व श्वेतक्रांती घडवून आणली. याशिवाय पंचायत राज व रोजगार हमी योजनाचे देखील वसंतराव नाईक हे शिल्पकार मानले जातात. ते 'पहिले शेतकरी मुख्यमंत्री व शेतकऱ्यांचा राजा' म्हणून ओळखले जातात. भूमिहिनांना लाखो एकर जमीन त्यांनी वाटप केली. शेतकऱ्यांच्या जीवनात स्वाभिमान आणि समृद्धी फुलवीण्याचे तसेच कृषीसंस्कृतीला नवसंजीवनी देण्याचे ऐतिहासिक कार्य महानायक वसंतराव नाईक यांनी केले. शिवाय पहिल्यांदाच चार कृषी विदयापीठाची स्थापना केली. १९७२ सारख्या भिषण दुष्काळातही महानायक वसंतराव नाईक यांच्या कारकिर्दीत कधी 'शेतकरी आत्महत्या' हा शब्द देखील गवसला नव्हता. शेतकऱ्यांवर त्यांचे जिवापाड प्रेम होते. शेती आणि मातीवरील त्यांची निस्सीम भक्ती ही भारतीय कृषीसंस्कृतीच्या इतिहासात एक प्रेरणा म्हणून ओळखली जाते. 'शेतकरी हा कारखानदार झालाच पाहिजे अन् शेतकऱ्यांचे लेकरं सुद्धा कलेक्टर झाली पाहिजे.' हे महानायक वसंतराव नाईक यांचे स्वप्न होते. थेट बांधावर आधुनिक कृषीतंत्रे व दूरगामी उपाययोजनांची अमलबजावणी याबरोबरच नव्या पिढीत शेती, शेतकऱ्याप्रति जिव्हाळा निर्माण केल्यास नाईकसाहेबांचे स्वप्ने पुर्णत्वास येऊ शकते. भारतीय कृषीसंस्कृतीला उजाळा देणाऱ्या 'कृषी दिन' या पावन पर्वाचे जनमाणसात अनन्यसाधारण असे महत्त्व असून शासकीय कार्यालय , गाव शहरात अनेक जयंती साजरी केली जाते. त्याचबरोबर थेट बांधावर-शेत शिवारातही प्रमाणात 'कृषी दिवस' साजरा होत असल्याने या पर्वाला एक विशेष महत्व प्राप्त झाले आहे. शेती व शेतकऱ्यांवरील निर्व्याज प्रेम आणि कृतज्ञता म्हणून थेट शेतकऱ्यांच्या बांधावर' मोहीमेचे प्रवर्तक एकनाथराव पवार यांनी सन २०११ पासून कृषी दिन थेट बांधावर साजरा करण्याची मोहीम सुरू केली. आज ही संकल्पना एक प्रथा म्हणून नावारूपाला आली.

सिटी न्यूज अकोला

बुधवार दि. १ जुलै २०२६  http://epaper.citynewssuperfast.com

# प्रभाग 12 मध्ये 100 कोटीची मोकळ्या जागेची चोरी

## ▪ शिवसेना नगरसेवक सागर भारूका यांचा सनसनाटी आरोप

प्रतिनिधी १ जुलै

**अकोला:** शहरातील प्रभाग क्रमांक १२ मध्ये १०० कोटी मूल्य असलेल्या मोकळ्या जागेची चोरी झाली. शहराचा विचार करता हा घोटाळा १ हजार कोटीच्या वरचा आहे. मुलांच्या खेळण्याच्या जागांवर डल्ला मारला आहे.

मुख्यमंत्र्यांनी चौकशी समिती गठीत करून जे कोणी नेते, अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शिवसेना



नगरसेवक सागर भारूका यांनी केली.

प्रभाग १२ मधील मुलांच्या खेळण्याच्या जागा हडप करण्यात आल्या. ही अतिशय गंभीर बाब आहे. विकास आराखड्यात ग्रीन झोन दाखवला आहे. परंतु मोठा घोळ झालेला दिसतो. २०२२ मध्ये द्विवेदी मॅडम आयुक्त असताना त्यांनी जिल्हाधिकारी यांना पत्र देऊन मोकळ्या जागा ताब्यात द्या अशी मागणी केली होती. २०२४,२५ आणि २६ मध्ये आयुक्त लहाने यांनी सरकारी मालमत्ता खुली करा असे आदेश दिले. परंतु त्यावर काहीच कारवाई नाही. सरकारी खजान्याची लूट असून या पावसाळी अधिवेशनात आवाज उठला पाहिजे असे सागर भारूका आर आर सी नेटवर्कशी बोलताना म्हणाले. प्रभाग क्रमांक १२ चा लढा आपण जिंकून दाखवू असा निर्धार व्यक्त केला.

## अकोला बार असोसिएशनच्या सर्व बार रूममध्ये उच्चगती वाय-फाय इंटरनेट सेवेचा शुभारंभ

प्रतिनिधी १ जुलै

**अकोला:** अकोला बार असोसिएशनच्या वतीने ३० जून २०२६ रोजी बार असोसिएशनच्या सर्व बार रूममध्ये आरआरसी ब्रॉडबँड उच्चगती वाय-फाय इंटरनेट सेवेचा शुभारंभ प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. डी. पी. सातवलेकर यांच्या हस्ते तसेच जिल्हा न्यायाधीश-२ सौ. एस. आर. पहाडे व ज्येष्ठ अधिवक्ता ॲड. बी. के. गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.





सध्याच्या डिजिटल युगात अधिवक्त्यांना न्यायालयीन कामकाज अधिक गतिमान, कार्यक्षम व तांत्रिकदृष्ट्या सक्षम पद्धतीने पार पाडता यावे, ऑनलाइन कायदे, न्यायनिर्णय, ई-फायलिंग, संशोधन तसेच इतर इंटरनेट आधारित सुविधांचा सहज लाभ घेता यावा या उद्देशाने बार असोसिएशनच्या सर्व बार रूममध्ये ही सुविधा नि शुल्क उपलब्ध करून देण्यात आली आहे.

हा महत्त्वाकांक्षी उपक्रम अकोला बार असोसिएशनच्या विद्यमान कार्यकारिणीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून साकार झाला आहे. अकोला बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अजय वाघमारे,, वरिष्ठ सचिव ॲड. दुष्यंत आर. धोत्रे, उपाध्यक्ष ॲड. विजय भांबेरे , महिला उपाध्यक्षा ॲड. शीतल गवई तसेच संयुक्त सचिव ॲड. प्रमोद डी. कोरडे हे प्रामुख्याने उपस्थित होते.

विद्यमान कार्यकारिणी बारच्या सर्वांगीण विकासासाठी व अधिवक्त्यांच्या हितासाठी सातत्याने कटिबद्ध असून, वाय-फाय इंटरनेट सेवेचा हा उपक्रम त्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. इंटरनेट क्रांतीच्या या युगात ही सुविधा अधिवक्त्यांच्या ज्ञानवृद्धीस, कायदेशीर संशोधनास, डिजिटल न्यायप्रणालीचा प्रभावी वापर करण्यास तसेच बार असोसिएशनला आधुनिक व तंत्रज्ञानस्नेही संस्थेच्या दिशेने नेण्यास निश्चितच मोलाची ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमास बार असोसिएशनचे पदाधिकारी, ज्येष्ठ अधिवक्ते, सदस्य अधिवक्ते तसेच न्यायालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पत्रकारांना धमकी प्रकरणी खासदारांवर कठोर कारवाईची मागणी



प्रतिनिधी १ जुलै

**अकोट :** ग्रामीण पत्रकार संघ तालुक्याचे वतीने पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत कारवाई करण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. खा.संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना खुलेआम जिवे मारण्याची धमकी दिल्याच्या कथित प्रकरणीअसभ्य वागणुक दिली व धमकावले. त्याप्रकरणी त्यांचेवर पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत तसेच भारतीय न्याय संहिता आणि इतर लागू कायदेशीर तरतुदीनुसार तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कार्यवाही करण्यात यावी. अशी मागणी ग्रामीण पत्रकार संघाचे राज्याध्यक्ष गजानन वाघमारे यांचे आदेशाने प्रदेश कार्यकारिणीचे राजेश डांगटे, अवीनाश राठोड,अनंत गावंडे, गोपाल चव्हाण यांच्या मार्गदर्शनात, विभागीय समन्वयक कमलेश राठी, विभागीय उपाध्यक्ष, अहमद शेख,जिल्हा उपाध्यक्ष राजेश सावीकार,पवन बेलसरे यांचे प्रमुख उपस्थितीत तालुकाध्यक्ष नरेंद्र कोंडे यांच्या नेतृत्वात उपविभागीय अधिकारी मार्फत दिले.

ग्रामीण पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष अरुण काकड,सचीव देवानंद आंग्रे, यांचेसह, गोवर्धन चव्हाण, साधुबुवा खोटरे, शरद भेंडे, धन्नु बायवार,पुर्णाजी खोडके, शाम महाजन,वैभव गुजरकर यांचे सह पत्रकार संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## उन्हाळी सुट्टीनंतर लाल बहादूर शास्त्री ज्ञानपीठात पुन्हा गजबज

प्रतिनिधी १ जुलै

**अकोट :** उन्हाळी सुट्टीनंतर लाल बहादूर शास्त्री ज्ञानपीठात पुन्हा एकदा विद्यार्थ्यांची लगबग आणि उत्साह पाहायला मिळाला. दीर्घ सुट्टीनंतर शाळा सुरू होताच विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. नव्या शैक्षणिक सत्राच्या प्रारंभी शाळा परिसरात आनंद, उत्साह आणि सकारात्मक ऊर्जेचे वातावरण निर्माण झाले होते.

विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया होते. यावेळी उपाध्यक्ष लूनकरण डागा, सचिव प्रमोद चांडक, प्राचार्य रामेश्वर पातोंड तसेच उपप्राचार्य नितीन गावंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेच्या कोषाध्यक्षा रेखाजी चांडक यांनी विद्यार्थ्यांचे कुमकुम तिलक लावून स्वागत केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना नव्या जोमाने, शिस्तबद्धपणे आणि जिद्दीने अभ्यास करण्याचे आवाहन केले. तसेच आगामी शैक्षणिक वर्षातील विविध उपक्रम, स्पर्धा आणि शैक्षणिक कार्यक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहण्याचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात किरण मॅडम आणि प्राजक्ता महाजन यांचे विशेष योगदान लाभले. कार्यक्रमाचे प्रभावी आणि आकर्षक सूत्रसंचालन विशाल चांदूरकर यांनी केले. तर कुमारी दीक्षिता चोपडे हिने उपस्थित मान्यवर, पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

## तालुक्यात 85 ग्रामपंचायतींची सामाजिक अंकेक्षण जनसुनावणी



प्रतिनिधी १ जुलै

**अकोट :** सामाजिक अंकेक्षण पारदर्शकता सोसायटी, मंत्रालय मुंबई व पंचायत समिती अकोट यांच्या संयुक्त विद्यमाने अकोट तालुक्यातील ८५ ग्रामपंचायतींच्या सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेची अंतिम जनसुनावणी आज येथे अत्यंत यशस्वीरीत्या व पारदर्शक वातावरणात पार पडली.

या जाहीर जनसुनावणी दरम्यान तालुक्यातील विकासकामांच्या सामाजिक अंकेक्षणाचा अहवाल वाचन करण्यात आला,मजूर, दक्षता समिती आणि रोजगार सेवकांच्या मानधनाचा प्रश्न शासन दरबारी मांडणार तसेच रोजगार सेवकांचे मानधन व मजुरांच्या विविध प्रश्नांवर महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. प्रमुख मान्यवरांची उपस्थिती या जनसुनावणी प्रक्रियेसाठी विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा कायदेतज्ज्ञ सीमा कुलकर्णी यांनी मुख्य पॅनल सदस्य म्हणून काम पाहिले. तसेच समिती सदस्य म्हणून पत्रकार प्रतिनिधी गणेश शंकर वाकोडे, मजूर प्रतिनिधी श्रीमती मंगला वानखेडे, संस्था प्रतिनिधी अनिता पांडे आणि जिल्हा साधन व्यक्ती शितल पाटील मानखैर यांनी उपस्थित राहून सुनावणीची प्रक्रिया पूर्ण केली. अकोटचे गटविकास अधिकारी रमाकांत माळी, सह गट विकास अधिकारी खुम्मकर, एपीओ बूंदे , तांत्रिक अधिकारी संदीप आगे यांच्यासह तालुका कृषी अधिकारी आणि वनीकरण विभाग अधिकारी उपस्थित होते.

जनसुनावणीत रोजगार सेवकांच्या मानधनाचा विषय गांभीर्याने घेतला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सामाजिक अंकेक्षण टीम आणि ग्राम साधन व्यक्ती विपुल लिंगोट, गणेश चव्हाण, आशिष चोटमल यांच्यासह संपूर्ण टीमने परिश्रम घेतले.

## गावात वायरमन नसल्याने पंचाईत

प्रतिनिधी १ जुलै

**हातरूण :** पाणी पावसाचे दिवसात वीज पुरवठा कधी खंडित होईल सांगता येत नाही. परंतु गावात एकही वायरमन हजर राहत नसल्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. गावात रात्रंदिवस वायरमन हजर राहिला पाहिजे. नसल्यास गावातील नागरिकांना अंध्यारात रहाण्याची वेळ येते. पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे साप, विंचू चावण्याची दाट शक्यता असते. गावात एक वायरमन उपस्थित असला पाहिजे अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६

माँ. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय

गायत्री नगर. अकोला

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता १ ली ते १० वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार



मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय

मो. ९९२११८६७१५, ९५११२५४९५९, ९४२१८९५७९०, ९९६०४३७३६६

## राष्ट्रीय शाळेत माजी विद्यार्थ्यांकडून विद्यार्थ्यांचे आगळे वेगळे स्वागत



प्रतिनिधी १ जुलै

**अकोला :** स्थानिक अकोला टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर शाळा उमरी मोठी येथे शाळेचा पहिला दिवस विद्यार्थ्यांसाठी पर्वणी ठरला शाळेतील चिमुकल्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी स्कूल बॅग, वॉटर बॅग, मिठाई, चॉकलेट पुष्पगुच्छ भेट देऊन आगळ्या वेगळ्या पद्धतीने सर्व चिमुकल्या विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसांडून वाहत होता याच सोबत राष्ट्रीय शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारी वृंद यांचा सुद्धा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संपदा नावकर मॅडम बर कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित म्हणून दिगंबर वनारे , उमेश मसने, मुख्याध्यापक नयना इनामदार , मुख्याध्यापक दत्तात्रय कोल्हे, योगेश यमतकर सर, रूपाताई ठाकरे मॅडम सुनील भातुलकर, तर उपस्थिती म्हणून सारिका काळे मॅडम, विजय मेश्राम, प्रतिमा वडगावकर ,किरण सावके, संतोष गावंडे, शरद इंगोले, अंबादास निकाळजे, शैलेश ओळंबे, रवींद्र वानखडे, नितीन बर्गे , गुड्डू अत्तर कार, बबलू इंगोले, महादेव पत्रकार इत्यादींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी मुरूमकर मॅडम तर आभार प्रदर्शन साधनाताई देशमुख मॅडम यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी व पालक यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## जिप शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वितरित

प्रतिनिधी १ जुलै

**हिवरखेड :** येथील जि, प , प्राथमिक कन्या शाळेत ३०, जून रोजी येथील चिमुकल्या विद्यार्थ्यांन मध्ये आनंदाचे वातावरण दिसून आले, बऱ्याच दिवसांनंतर चिमुकले विद्यार्थ्यांनी पुन्हा शाळा सुरू होण्याच्या दुष्टीनेकोणाने परत एकमेकांस भेटले,या दिनी शाळेच्या वतीने येथील चिमुकल्या विद्यार्थ्यांना शालेय



गणवेश व शालेय वस्तू वितरीत करण्यात आल्या, यावेळी शाळेचे मुख्याध्यापक निलेश खिरोडकार, खडसे गुरुजी, आम्ले मैडम, भोपळे मैडम, लहाने मैडम, पल्लवी खिरोडकार इत्यादीसह पाल्य वर्गाची उपस्थिती होती,

## वसुंधरा ज्ञानपीठ मध्ये नव्या शैक्षणिक वर्षाचे उत्साहात स्वागत

वि. प्रतिनिधी २८ जून

**अकोट :** उन्हाळी सुट्टीनंतर वसुंधरा ज्ञानपीठात नव्या शैक्षणिक वर्षाची उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात सुरुवात करण्यात आली. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे प्रवेशद्वारावर फुले, टाळ्यांचा कडकडाट आणि आकर्षक सजावटीच्या साक्षीने स्वागत करण्यात आले.

नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात सामाजिक बांधिलकीच्या संदेशाने व्हावी या उद्देशाने नवप्रवेशित विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

मुख्याध्यापक शिवचरण नारे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना जिद्द, चिकाटी आणि सातत्य यांच्या बळावर यश संपादन करता येते, असे सांगितले. सकाळ





सत्राच्या पर्यवेक्षिका कु. छाया बनकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# अकोट विधानसभा मतदारसंघात मतदारयादी पुनरीक्षण मोहिमेला प्रारंभ

वि. प्रतिनिधी १ जुलै

**अकोट :** २८-अकोट विधानसभा मतदारसंघात मतदार यादीच्या सखोल पुनरीक्षण कार्यक्रमास मंगळवारपासून सुरुवात झाली. अकोट व तेल्हारा तालुक्यातील एकूण ३४६ मतदान केंद्रांवर मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन मतदारांना एन्युमरेशन फॉर्मचे वितरण करीत आहेत.

या मोहिमेत अकोट





तालुक्यातील १८६ आणि तेल्हारा तालुक्यातील १६० अशा एकूण ३४६ मतदान केंद्रांचा समावेश आहे. मतदार यादीतील माहिती अद्ययावत व अचूक करण्याच्या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त झालेले एन्युमरेशन फॉर्म मतदारांना वितरित करण्यात येत आहेत.

मोहिमेच्या प्रारंभी मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर, सहायक मतदार नोंदणी अधिकारी डॉ. सुनील चव्हाण, अतिरिक्त सहायक मतदार नोंदणी अधिकारी सुभाष सावंग, मनोज मानकर, सुधीर थेटे व कु. अंजली घरडे यांनी विविध मतदान केंद्रांना भेटी देऊन कामकाजाची पाहणी केली. तसेच बीएलओंसोबत प्रत्यक्ष अर्ज वितरण मोहिमेत सहभागी होत त्यांना आवश्यक मार्गदर्शन केले.

मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे सांगून प्रशासनाने सर्व मतदारांना आवाहन केले आहे. घरपोच येणाऱ्या बीएलओंना आवश्यक माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून देत सहकार्य करावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी मनोज लोणारकर यांनी केले.

## महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला
## ई-निविदा सुचना ०७/ २०२६-२०२७

जावक क्रमांक/४०५८/ ईनिसु-०७/ निलि / २०२६ / दिनांक २४/०६/२०२६

email.akola.ee@mahapwd.gov.in  Phone No 0724-2435197

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला या महराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामांकरिता ब-१ नमुन्यातील काम क्र.१ ते ३ निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन मागविण्यात येत आहे) निविदेतील अटी व शर्ती यांची पूर्तता करतील, असे सक्षम कंत्राटदार तसेच अंतरराष्ट्रीय कंपनी यांची उप कंपनी भारतीय असल्यास निविदे स्पर्धे मध्ये भाग घेवू शकेल. निविदा स्पर्धेमध्ये भाग घेऊ शकतील. कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे अटी व शर्तीच्या अधीन राहून निविदेमध्ये सहभाग नोंदवू शकतील. ई-निविदा संकेत स्थळ https://www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची किंमत (रुपये) |
|---|---|---|
| १ | अकोला जिल्हयातील मुर्तिजापूर तालुक्यातील बोर्टा माना जामठी कार्ली रस्ता प्रजिमा-१५ च्या कि.मी. ३/०० ते ७/५०० व १०/०० ते १५/५०० मध्ये रस्त्याची रुंदीकरणासह सुधारणा करणे ता. मुर्तिजापूर | ९९२२२३४८ |
| २ | अकोला जिल्हयातील बार्शिटाकळी तालुक्यातील आंबेटाकळी कापशी बार्शिटाकळी रामा-२७४ कि.मी.१३६/०० ते १४२/५०० मध्ये रस्त्याची सुधारणा करणे (राममा-७५३ ई वरवंड फाटा पासून करवंड पर्यत आणि राज्यमार्गाचा विस्तार प्रजिमा-१२५ करवंड पासून उंद्री पर्यत उंद्री पासून आंबेटाकळी आडगांव पर्यत आणि दिग्रस बु. पासून हिंगणा आणि वाडेगांव बार्शिटाकळी पर्यत आणि वडाळा पासून पिंजर खेर्डा नागझरी ते राममा-३६१ सी पर्यत) | ५२८१८४९० |
| ३ | अकोला जिल्हयातील कुरुम ते माटोडा रस्ता प्रजिमा-२५ कि.मी.०/०० ते १/६०० मध्ये रस्त्याची रुंदीकरणासह सुधारणा करणे | ४६१३४९२९ |

**अटी व शर्ती -**

१. सर्व पात्र / इच्छूक निविदाकारांनी निविदा डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या https://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

२. ई-निविदा काम क्र.१ ते ३ कामांची ई-निविदा दिनांक ०१.०७.२०२६ रोजी १०.०० पासून दिनांक ०८.०७.२०२६ रोजी १८.०० वाजे पर्यंत डाऊनलोड व हॅश सबमीशन करता येतील. ई-निविदा कामांची ई-निविदा उघडण्याचा दिनांक १०.०७.२०२६ (पुढील ई-निविदा विषयक कार्यक्रम ऑनलाईन प्रमाणे)

३ वरील काम क्रं.१ ते ३ कामाची निविदा पूर्व बैठक दिनांक ०२/०७/२०२६ वेळ १२.०० वा. मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती येथे आयोजित करण्यात येईल.

४ वरील काम क्रं. ०१ ते ०३ कामांची ई-निविदा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला येथे उघडण्यात येतील

५. खालील संकेत स्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध राहील. https://www.mahatenders.gov.in

६ ईतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये उपलब्ध आहेत. कोणत्याही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न सांगता अस्विकृत करण्याचे सर्व अधिकार सक्षम प्राधिकरणाकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

७. वरील कामांसाठी कंत्राटदाराने त्यांचे अभियंत्यासह मोक्याची जागेची पाहणी करून ई-निविदा सादर करावी व कोणतेही अतिरिक्त दावे स्विकारल्या जाणार नाही. तसेच निधी उपलब्ध झाल्यानुसार देयके अदा करण्यांत येतील.

८ ऑनलाईन वेळापत्रक लागू व अंतिम राहील.

**(प्रसाद पाटील)**
**कार्यकारी अभियंता सा. बा. विभाग अकोला**

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार, दि. १ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

फोकस
● अतिष देशमुख @ वाशीम ●




● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

आकांक्षीत जिल्हा म्हणून वाशीम जिल्ह्याची नोंद आहे. सिंचनाचा अनुशेष देखील मोठ्या प्रमाणात आहे. नविन मोठेएकही प्रकल्प जिल्हयात आला नाही. शिवाय प्रकल्प आणण्यासाठी एकाही लोकप्रतिनिधीनी पुढाकार घेतला नाही. यावर कळस म्हणजे सिंचन विभागाला भ्रष्टाचाराने बरबटले असतांना सरकारने जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय शेगाव येथे स्थलांतरित करून जिल्ह्यावर अन्याय केला आहे. तर अतिवृष्टीमुळे शेतीतील पिकेच नव्हे तर संपूर्ण नदी व नाल्याकाठची शेतीतील माती खरडून गेली. शेतीच नष्ट झाली. सुरूवातीला अतिवृष्टीच्या मदतीतून जिल्हा वगळला नंतर समाविष्ट केला. तरी सुध्दा अद्यापही बळीराजा मदतीच्या प्रतिक्षेतच आहे. नदी जोड प्रकल्पातून वाशीम जिल्ह्याला वगळले असून अद्यापही नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाला नाही. अमरावती विद्यापिठाचे उपकेंद्र वाशीमला व्हावे यासाठी ३० वर्षापासून सामाजिक संघटनेसह राजकारण्यांनी पुढाकार घेतला होता. त्याचेही प्रयत्न असफल झाले. आता विद्यापीठ उपकेंद्र अकोलाला होणार असल्याचे जाहीर झाल्याने आपले लोकप्रतिनिधी किती निष्क्रीय आहे हे सिध्द झाले. शहरातून जाणारा अकोला - नांदेड रस्ता चौपदरी ऐवजी दुपदरीच होत आहे. जिल्ह्यात एमआयडीसी भकास झाली असून मुलभूत सुविधांचा अभाव आहे. जिल्ह्यातील शहरासह ग्रामीण भागातील रस्ते खड्ड्यात गेले आहेत. योजना खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्याच नाहीत. त्यामुळे जिल्ह्याचा आकांक्षीत जिल्हा म्हणून असलेला कलंक पुसण्यासाठी आलेला निधीही भ्रष्टअधिकाऱ्यांमुळेच खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतच नाही. अर्थसंकल्प अधिवेशनातही जिल्ह्याला काहीच मिळाले नाही. लोकप्रतिनिधींनीही काहीच केले नाही.

# कधी मिळणार न्याय जिल्ह्यावर अन्याय !



* रस्ता चौपदरी नव्हे तर होतोय दुपदरी
* भ्रष्टाचार निरंतर, पाटबंधारे मंडळाचे स्थलांतर
* अमरावती विद्यापिठ उपकेंद्राची लढाई व्यर्थ
* नदीजोड प्रकल्पातून वाशीम जिल्हा वगळला




आकांक्षीत जिल्हा म्हणून ओळख असलेल्या वाशिम जिल्ह्याच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच आली असून वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पातून वाशिम जिल्हा वगळण्यात आला आहे. त्यामुळे सिंचनाचा अनुशेष भरून निघण्याची शेतकऱ्यांची आशा मावळली आहे. कारण अधिवेशनातही बैठक आणि चर्चा घेवून कोणताही ठोस निर्णय झाला नाही. नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाल्याचे पोस्टर लावून चमकोगिरी करणारे नेते मात्र आता तोंडघशी पडले असून जिल्ह्यातील राजकारण्यांची निष्क्रियता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प हा राज्यस्तरीय नदीजोड प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पाव्दारे वैनगंगा नदीवरील भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द प्रकल्पात पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून पुर्णा-तापी खोऱ्यातील बुलढाणा जिल्हयातील नळगंगा प्रकल्पापर्यंत नदीजोड कालव्याद्वारे वळविणे प्रस्तावित आहे. या कालव्याव्दारे विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा ह्या सहा जिल्ह्यातील १५ तालुक्यातल्या एकूण ३७१२७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्पाची जलसंपदा विभागाच्या सन २०२२-२३ च्या दरसूचीनुसार प्रकल्पाची किंमत रु.८८,५७५ कोटी इतकी आहे. पूर्वी या प्रकल्पात वाशिम जिल्ह्याचाही समावेश नव्हता आता मुख्यमंत्री दुसऱ्या टप्प्यात वाशीम जिल्ह्याचा समावेश करण्याचे आश्वासन २८ नोव्हेंबरच्या सभेत दिले यावरून जिल्ह्याचा नदीजोड प्रकल्पात समावेश नव्हता हे सिध्द झाले आहेत. आताही अधिवेशनात बैठकीचे सत्र सुरू असून आकांक्षीत जिल्ह्याला फक्त बैठका व आश्वासनावरच ठेवले आहे. जिल्ह्याकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले आहे. विदर्भातील हिवाळी अधिवेशनात जिल्ह्याच्या विविध प्रश्नांवर चर्चा होवून निर्णय होतील अशी अपेक्षा होती. मात्र, अधिवेशनात जिल्ह्याला कोणताच मोठा फायदा झाला नाही. कुठल्या प्रकारचे ठोस निर्णय न झाल्याने आकांक्षीत जिल्ह्याला दुर्लक्षीत करत उपेक्षीत ठेवण्यात आले आहे. आकांक्षीत जिल्हा म्हणून सर्वप्रथम वाशीम जिल्ह्याचा विकासाच्या दृष्टीने विचार व्हावा यासाठी जिल्ह्यातील नेत्यांनी पुढे येणे गरजेचे आहे. निव्वळ पत्र आणि आश्वासन देवून आशेवर ठेवणे म्हणूजेच जिल्हा वासियांची फसवणूक करणे आहे. आजपर्यंत कोणतेच मोठे प्रकल्प आले नाहीत. आले तर ते होवू दिले नाहीत. जे जिल्ह्यात आहे ते इतर जिल्ह्यात नेल्या जात आहे. रस्तेही भ्रष्टाचाराने खड्ड्यात गेले आहेत.




## जिल्ह्यात भ्रष्टाचार निरंतर, पाटबंधारे मंडळाचे स्थलांतर...

मागास जिल्हा म्हणून वाशीम जिल्ह्याची नोंद आहे. सिंचनाचा अनुशेष देखील मोठ्या प्रमाणात आहे. नविन मोठेएकही प्रकल्प जिल्हयात आला नाही. शिवाय प्रकल्प आणण्यासाठी एकाही लोकप्रतिनिधीनी पुढाकार घेतला नाही. यावर कळस म्हणजे सिंचन विभागाला भ्रष्टाचाराने बरबटले असतांना सरकारने जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय शेगाव येथे स्थलांतरित करून जिल्ह्यावर अन्याय केला आहे. याविरोधात जिल्ह्यातील आमदार, खासदार व पुढाऱ्यांनी दिखावा म्हणुन तीव्र विरोध केला. तरीही, २७ ऑक्टोबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे शेगाव येथे उद्घाटन संपन्न झाले. आता साप गेल्या नंतर काडया मारण्यात काय अर्थ अशी चर्चा होत आहे. खुदद नितिन गडकरींनीही जिल्हयातील अधिका-यांच्या लक्ष्मी दर्शनाच्या लालसेमुळे व लोकप्रतिनिधीच्या निष्क्रीये ते मुळे अनेक प्रकल्प रखडल्याचे एक दोन वेळा नव्हे तर तीन वेळा जाहिर सभेत म्हटले आहे.

जिल्ह्यातील पाणी टंचाई व दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन सन २००८ मध्ये




वाशीम जिल्ह्यात मंडळ कार्यालयाची स्थापना करण्यात आली होती. त्यामुळे सिंचन क्षमता वाढीस मदत झाली. परंतु महाराष्ट्र शासन जल संपदा विभागाने २३ ऑक्टोबर रोजी शासन निर्णय काढून मंडळ कार्यालय स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला. ही बाब मागास आणि अकांक्षीत असलेल्या वाशीम जिल्ह्यासाठी अन्यायकारक असून आमदार, खासदार आजी माजी हे नेते पुढे आले. त्यांनी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यांकडे वरिष्ठ स्तरावर प्रयत्न करणार असल्याचे माध्यमांना सांगितले होते. त्यांचे प्रयत्न व्यर्थ गेले. तरी देखील जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव येथे स्थलांतरित करण्यात आले. २७ ऑक्टोबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. यामुळे सरकार विरोधात जिल्ह्यात तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. कार्यालय स्थलांतर होत असतांना निव्वळ दिखावा म्हणुन मागणी करतांना लोकप्रतिनिधी पुढाकार घेतात. मात्र जिल्हयात नविन मोठे प्रकल्प आणुन विकासाचा मार्ग काढतांना दिसत नाही. तर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीसह सामाजिक संघटनाही तात्पूर्तें आंदोलन करून विरोध दर्शविला. मात्र, त्यामधून काही मार्ग निघाला नाही.

## सिंचनाचा भ्रष्टाचार निवळला, नदीजोड प्रकल्पातून जिल्हा वगळला...




आकांक्षीत जिल्हा म्हणून ओळख असलेल्या वाशिम जिल्ह्याच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच आली असून वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पातून वाशिम जिल्हा वगळण्यात आला आहे. त्यामुळे सिंचनाचा अनुशेष भरून निघण्याची शेतकऱ्यांची आशा मावळली आहे. नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाल्याचे पोस्टर लावून चमकोगिरी करणारे नेते मात्र आता तोंडघशी पडले असून जिल्ह्यातील राजकारण्यांची निष्क्रियता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प हा राज्यस्तरीय नदीजोड प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पाव्दारे वैनगंगा नदीवरील भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द



प्रकल्पात पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून पुर्णा-तापी खोऱ्यातील बुलढाणा जिल्हयातील नळगंगा प्रकल्पापर्यंत नदीजोड कालव्याद्वारे वळविणे प्रस्तावित आहे. या कालव्याव्दारे विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा ह्या सहा जिल्ह्यातील १५ तालुक्यातल्या एकूण ३७१२७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्पाची जलसंपदा विभागाच्या सन २०२२-२३ च्या दरसूचीनुसार प्रकल्पाची किंमत रु.८८,५७५ कोटी इतकी आहे. पूर्वी या प्रकल्पात वाशिम जिल्ह्याचाही समावेश होता मात्र, ६ फेब्रुवारी रोजी राज्य सरकारने काढलेल्या शासन निर्णयात वाशिम जिल्ह्याचा उल्लेख नाही. त्यामुळे आकांक्षीत जिल्ह्याचा डाग पुसण्याच्या बाता करणाऱ्या लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

तरीही, २७ ऑक्टोबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे शेगाव येथे गेले.




## अमरावती विद्यापिठ उपकेंद्राचे भिजत घोंगडे कायम...

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा कलम ५ (८)अंतर्गत प्रत्येक विद्यापीठाने आपल्या शैक्षणिक नियोजनासाठी उपकेंद्र उभारणे बंधनकार आहे. मात्र, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेला ३९ वर्षे होऊनसुद्धा विद्यापीठ प्रशासनाने आपले उपकेंद्र सुरू केले नाही. दरम्यान, वाशीम येथे उपकेंद्र व्हावे, असा धोरणात्मक निर्णय विद्यापीठाच्या सिनेट सभेमध्ये झाला होता. त्याला उच्च व तंत्र शिक्षण विभागानेसुद्धा तत्वतः मान्यतही दिली होती. लोकप्रतिनिधींनी या संबंधि पुढाकारही घेतला होता. मात्र घोडे कुठे आडले तरी सुध्दा उपकेंद्राचा प्रश्न अद्यापही कायमच आहे. लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी उपकेंद्रासाठी उभी केलेली चळवळ थंडबस्त्यात पडली आहे.




## वाशीम येथे विद्यापिठ उपकेंद्राला तत्वतः मान्यता मिळाली होती...

वाशीम येथे उपकेंद्र व्हावे, याला उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून १ सप्टेंबर २०१० रोजी झालेल्या बैठकीत तत्वतः मान्यता देण्यात आली होती. शिवाय उपकेंद्रासाठी १७ कर्मचाऱ्यांची आवश्यकता असून, ६० कोटींचा खर्च अपेक्षित आहे हे सुद्धा यात ठरले. हा प्रस्ताव वित्त व संबंधित विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला. १५ वर्षांपासून तो रेंगाळला आहे. दरम्यान, बांधकामाच्या साहित्याचे भाव आणि कर्मचाऱ्यांचे पगारही वाढले. त्यामुळे आता हा खर्च ३०० कोटींपेक्षाही अधिक होणार आहे. त्यामुळे हा प्रस्ताव रखडला आहे. तर दुसरीकडे विद्यापिठ उपकेंद्र अकोल्याला होणार असल्याने पुन्हा एकदा वाशीम जिल्ह्यावर अन्याय झाला आहे. तरी सुध्दा उपकेंद्रासाठी लढणाऱ्या लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटना निद्रावस्थेत असून त्यांना जिल्ह्याच्या विकासाचे काहीच घेणे देणे नसल्याचे पुन्हा एकदा सिध्द होत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय नविन नगर परिषद कॉम्प्लेक्स, रविवार बाजार, वाशिम जि. वाशिम येथे प्रकाशित केले. ■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135